९०

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची १० वी बैठक दि.२३.०२.२०२४ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

- श्री. सुनील चव्हाण (भा. प्र.से.), सचिव, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे
- श्री. वि. बा. नाथ, महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. (व्ही.सी. द्वारे)
- श्री. अजय गुल्हाने, आयुक्त, मनरेगा, नागपुर यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- श्रीम. शुभांगी पोटे, अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (व्ही.सी. द्वारे).
- श्री. रविंद्र भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे.
- श्री. ऋषि राज गोसकी, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतीनिधी.
- आयुक्त, कामगार, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)
- आयुक्त, पशुसंवर्धन यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)
- श्री. ॲड. अमित गीते, अध्यक्ष, श्री एकलव्य सेवाभावी संस्था, परभणी (व्ही.सी. द्वारे).
- श्री. यशवंत पांडे, सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर (व्ही.सी. द्वारे).
- राज्य प्रमुख राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दिनांक २८/१२/२०२३ रोजीच्या नवव्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.२८.१२.२०२३ रोजीच्या नवव्या बैठकीचे इतिवृत्ताचे व सदर बैठकीत झालेल्या निर्णयावर केलेल्या अथवा कार्यवाहीत असलेल्या बाबी समितीस अवगत करून देण्यात आल्या. त्यातील विषय क्र. ८ मध्ये वसुंधरा पाणलोटविकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाचे निधी वितरण आदेश क्र. १४७ दि.२२.०१.२०२३ अन्वये प्रशासकीय निधी रक्कम रु. २.५० कोटी आत्मा संस्थेस PFMS प्रणालीद्वारे वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली होती तथापि शासन निर्देशानुसार संचालक आत्मा यांचे कार्यालयाकडून अद्याप बँक खाते उघडण्याबाबतची कार्यवाही न झाल्याने अद्याप प्रशासकीय निधी वितरीत न केल्याबाबत समितीस अवगत करण्यात आले. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २८.१२.२०२३ रोजीच्या नवव्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र. ८ बाबत मा. अध्यक्ष महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रशासकीय निधी रक्कम रु. २.५० कोटी यापुर्वी वितरीत केलेल्या पद्धतीनेच PFMS प्रणालीद्वारे जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांचे मार्फत जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांना वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व आत्मा संस्था पुणे. | |
| २ | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) दि. १८/०१/२०२४ रोजीच्या राज्यस्तरीय | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) ९ व्या बैठकीत २० प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | (SLTC) बैठकीत मान्यता मिळालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता प्रदान करणे. | तांत्रिक समितीच्या (SLTC) ९ व्या बैठकीत २० प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना व दि. २३/०२/२०२४ रोजीच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) १० व्या बैठकीत २५ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिली व राज्य मान्यता समितीस सादर करण्यासाठी शिफारिस करण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणेस्तव चर्चा झाली. | अहवालांना व १० व्या बैठकीत २५ प्रकल्पांच्या शिफारस केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) परिशिष्ट अ मधील तपशीलाप्रमाणे जिल्ह्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे मान्यता देण्यात आली. DPR मधील मजकूराच्या सत्यतेबाबत जिल्हा जल संधारण अधिकारी जबाबदार राहतील. | २.०, पुणे. | |
| ३ | सन २०२४-२५ या वर्षाच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणे. | सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक कृती आराखडा समितीपुढे सादर करण्यात आला. सदर आराखड्यातील त्रैमासिक खर्चाची आकडेवारीमध्ये बदल करण्याबाबतच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | मा. अध्यक्षांनी दिलेल्या सुचनांनुसार योग्य तो बदल करून सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक कृती आराखड्यास परिशिष्ट ब प्रमाणे मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |
| ४ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ घेणेकरिता सेवा पुरवठादार निश्चित करणेकरिता ई-निविदा मसुदा समितीसमोर | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ घेणेकरिता सेवा पुरवठादार निश्चित करणेकरिता ई-निविदा मसुद्यास परिशिष्ट क | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | कंत्राटी मनुष्यबळ घेणेकरिता सेवा पुरवठादार निश्चित करणेकरिता ई-निविदा मसुद्यास मान्यता देणे. | सादर करण्यात आला. | प्रमाणे मान्यता देण्यात आली. | | |
| ५ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत LRI (Land Resource Inventory), NBSS यांच्या सहकार्याने करण्यास मान्यता देणे. | Land Resource Inventory (LRI) तयार करण्याबाबत NBSS या संस्थेचे Senior Scientist डॉ. बिस्वास व NBSS संस्थेचे संचालक यांनी प्रस्तावाचे सादरीकरण केले. याबाबत संस्थेकडून सूचवण्यात आलेली प्रती हेक्टर किंमत कमी करण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी LRI अंतर्गत निवडलेल्या सर्व जिल्ह्यातील एकत्रित खर्चाचा विचार करुन ही किंमत देण्यात आली आहे असे डॉ. बिस्वास यांनी सांगीतले. संस्थेने दिलेल्या प्रस्तावात २ वर्षांचा कालावधी नमूद केलेला आहे. परंतु प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेचा | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत LRI (Land Resource Inventory), NBSS ICAR यांच्या & LUP सहकार्याने करण्यास मान्यता देण्यात आली. वसुंधरा कार्यालय व NBSS यांनी मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या सुचनांचा अंतर्भाव करुन करारनामा (MOU) तयार करून LRI तयार करण्याचे काम सुरू करावे.<br>LRI वरील खर्च हा योजनेअंतर्गत उपलब्ध घटकांच्या निधीतून तयार केलेल्या Flexi Fund मधून करण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | कालावधी मार्च २०२६ पर्यंत असल्याने LRI चे कामकाज मार्च २०२६ पूर्वी पुर्ण होणे आवश्यक असल्याचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. यावर डॉ. बिस्वास यांनी मार्च २०२५ पर्यंत LRI प्रकल्प अहवाल वसुंधरा कार्यालयाला सादर करणार असल्याचे सांगीतले.<br>मा. अध्यक्ष यांनी LRI संदर्भात खालीलप्रमाणे सुचना NBSS च्या संचालकांना दिल्या<br>१) NBSS ने त्यांच्याद्वारे LRI चे कामकाजाचे टप्पे निहाय वेळापत्रक सादर करावे.<br>२) कामांच्या टप्प्यानुसार निधी वितरण सादर करावे.<br>३) १४ प्रकल्पांची निवड कोणत्या निकषांवर करण्यात आली हे संस्थेने नमुद करावे.<br>४) NBSS व वसुंधरा कार्यालय यांच्या जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात.<br>LRI बाब ही preparatory phase मध्ये | | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | येत असल्याने यासाठी येणारा खर्च कोणत्या निधीतून करावा याबद्दल केंद्र शासनास विचारणा केली असता LRI वरील खर्च हा DPR अंतर्गत येणाऱ्या निधीतून करावा अशा सूचना केंद्राने दिल्या. परंतु DPR अंतर्गत उपलब्ध असलेला १% निधी हा DPR तयार करण्यासाठी आवश्यक आहे. यास्तव केंद्र शासन स्तरावरील अधिकाऱ्यांशी दूरध्वनी संभाषणद्वारे दिलेल्या माहितीनुसार LRI वरील खर्च हा Flexi Fund मधून करता येईल. यासाठी योजनेअंतर्गत उपलब्ध घटकांच्या निधीतुन तयार केलेल्या Flexi Fund मधून LRI वरील खर्च करता येईल, याबाबत सभेमध्ये चर्चा झाली. | | | |
| ६ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास | दि. २८/१२/२०२३ रोजी पार पडलेल्या राज्य स्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत वाल्मी संस्थेने सादर केलेले जिल्हा प्रशिक्षण संस्था | जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन संस्था (LRA) या क्षेत्रिय स्तरावरील प्रशिक्षण | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>बैठकीतील चर्चा</th><th>बैठकीतील निर्णय</th><th>अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी</th><th>अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी</th></tr>
<tr><td></td><td>घटक २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका प्रशिक्षण संस्था (LRA) या क्षेत्रिय स्तरावरील प्रशिक्षण संस्थांचे दर निश्चित करणेबाबत.</td><td>(DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका प्रशिक्षण संस्था (LRA) या क्षेत्रिय स्तरावरील प्रशिक्षण संस्थांच्या प्रशिक्षण दरासंदर्भात निर्णय घेण्यासाठी समितीसमोर विषय मांडण्यात आला होता. परंतु केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांचे प्रशिक्षण दर किती आहेत याची माहिती घेऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करून पुढील राज्य स्तरीय नोडल यंत्रणा बैठकीत सादर करावेत जेणेकरून जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन संस्था (LRA) या संस्थांचे दर निश्चित करता येतील असे निर्देश समितीने दिले होते. त्यानुसार स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन, आत्मा, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान(MSRLM), राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना (RGSA) या सर्व योजनांच्या अमंलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना त्यांच्या अधिनिस्त जी प्रशिक्षणे आयोजित केली</td><td>संस्थांचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यास समितीने मान्यता दिली-<br>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>स्तर</th><th>प्रशिक्षणाचे स्वरूप</th><th>दर (प्रती दिन प्रती प्रशिक्षणार्थी रु.)</th></tr>
<tr><td>१</td><td>जिल्हा स्तर - जिल्हा संसाधन संस्था</td><td>निवासी</td><td>१५००</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रकल्प स्तर - प्रकल्प प्रशिक्षण संस्था</td><td>अनिवासी</td><td>७५०</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रकल्प स्तर - उपजीविका संसाधन संस्था</td><td>अनिवासी</td><td>५००</td></tr>
</table>
तसेच राज्यस्तरावर वाल्मी संस्थेमार्फत जे अंतरराज्यीय अभ्यासदौरे आयोजित केले जातात त्यासाठी प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी रु. ५०००/- च्या मर्यादेत दर निश्चित करण्यात</td><td>२.०, पुणे.</td><td></td></tr>
</table>

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | जातात त्यांचे जिल्हा, प्रकल्प, ग्राम पातळीवरील प्रतीदिन प्रती प्रशिक्षणार्थी (निवासी/अनिवासी प्रशिक्षण) दर कळविणे बाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता त्यानुसार आत्मा, राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना कक्ष , महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी त्यांचे प्रशिक्षण दर कळविले आहेत व त्यांचा तुलनात्मक तक्ता सादर केलेबाबत उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (क्षमता बांधणी) यांनी समितीस माहिती दिली. या तिन्ही मधील जे दर जास्त असतील त्यास मान्यता देणेबाबत समितीमध्ये चर्चा झाली. तसेच जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन संस्था (LRA) या प्रशिक्षण संस्थांची निवडसूची तयार करण्यासाठी ज्या संस्थांना ५० किंवा ५० पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले आहेत त्यांना पात्र ठरवून प्रत्येक स्तरावरील संस्थांचा जिल्हा निहाय किती प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे | येत आहे.<br>जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) , उपजीविका संसाधन संस्था (LRA) या संस्थांची निवडसूची तयार करताना ५० किंवा ५० पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले आहेत ५० त्या संस्थांना समितीने पात्र ठरवून प्रत्येक स्तरावरील कामाचा भार निश्चित करून त्यानुसार वाल्मी संस्थेने सादर केलेल्या गुणसूचीतील अधिक गुणांकन प्राप्त संस्थांची निश्चिती करण्यात यावी. निवडसूची तयार करत असताना १:३ या पद्धतीने संस्थांची निवड करावी असे निर्देश समितीने दिले. | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | अपेक्षित आहे त्याची निश्चिती करून प्रत्येक स्तरावरील संस्थेवरील कामाचा भार लक्षात घेऊन संस्थांची निवड करण्यात यावी याबाबत समितीमध्ये चर्चा झाली. तसेच प्रशिक्षणाचा दर्जा उच्च असावा याची खात्री करणे आवश्यक असून त्यासाठी प्रशिक्षणार्थींचे अभिप्राय व जिल्हा स्तरीय तपासणी पथकाचा अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक राहील अशा सूचना मा. अध्यक्षांनी चर्चेदरम्यान दिल्या. | | | |
| ७ | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय. | १) वसुंधरा, पुणे कार्यालयातील श्री. नाईकनवरे स.ले.अ. यांना यापूर्वी माहे मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे तथापि अद्याप IWMP १.० या योजनेचे लेखाविषयक कामकाज सद्यस्थितीत चालू आहे व प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेअंतर्गत लेखा सहाय्यक हे पद अद्याप रिक्त असून PFMS Expert या पदावर | वसुंधरा, पुणे कार्यालयातील श्री. राजेंद्र नाईकनवरे, स.ले.अ. यांना माहे सप्टेंबर २०२४ पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | नवीन कंत्राटी कर्मचारी रुजू झालेले आहेत. तथापि या कार्यालयातील कंत्राटी पदावर नव्याने येणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेखाविषयक कामकाज व्यवस्थित समजावून सांगण्याकरिता व योजनेच्या कामाचा व्याप पाहता श्री. नाईकनवरे यांना मुदतवाढ देणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | | | |
| | | २) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेअंतर्गत ५५२ पदांचा कंत्राटी मनुष्यबळाचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधात वसुंधरा पुणे कार्यालयात १ GIS Associate व २ शिपाई पदे मंजूर आहेत. तथापि कामाचा व्याप पाहता अजून १ GIS Associate व १ शिपाई पद मंजूर करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेअंतर्गत अधिकचे १ GIS Associate व १ शिपाई पद कंत्राटी तत्वावर वसुंधरा पुणे कार्यालयास घेण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | ३) प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती घटकाच्या अंमलबजावणीसाठी आत्मा यंत्रणेस रु. ४० कोटी वितरीत करणेबाबत. | दि. २५/०१/२०२३ च्या वसुंधरा कार्यालयाच्या निधी वितरण आदेशान्वये प्रत्येक जिल्ह्याला मार्गदर्शक सूचनानुसार देय असणारी रक्कम जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्रामार्फत आत्मा यंत्रणेचे फिरता निधीचे बँक खाते PFMS प्रणाली मध्ये जिल्हा स्तरीय लॉगीन मधून vender register करून निधी वर्ग करण्यात आला. एकूण रु. २६.७१ कोटी एवढी रक्कम योजनेत सहभागी ३० जिल्ह्यातील आत्मा यंत्रणेच्या फिरत्या निधी खात्यावर प्रेरक प्रवेश उपक्रमाअंतर्गत वर्ग करण्यात आली. PFMS प्रणालीमध्ये Vender register करून निधी जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या खात्यावर वर्ग केला. केंद्र शासनाकडून निधीचा हप्ता प्राप्त करून घेण्यासाठी रु. २५ कोटी निधी वितरणास शासन स्तरावरून मान्यता प्रदान करण्यात आल्यामुळे दि.२४/११/२०२३ च्या निधी वितरण आदेशाद्वारे उत्पादन पद्धती या घटकासाठी | उत्पादन पद्धती घटकांतर्गत रु. ४० कोटी आत्मा यंत्रणेच्या दि.१७/११/२०२३ च्या पत्रातील मागणीनुसार यापूर्वी आत्मा यंत्रणेस ज्या पद्धतीने वितरीत केलेला आहे त्याच पद्धतीने वितरीत करण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांच्या स्तरावर आत्मा स्वरावर वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने आढावा घेऊन शेतकरी उत्पादक संघ स्थापना करणे व त्यांच्यामार्फत उत्पादन पद्धती घटक राबविणे यासाठी गती देणे आवश्यक असून प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत आत्मा संस्थेने केलेल्या कार्यवाहीचे गुणात्मक परीक्षण करणे आवश्यक असून यापुढे आत्मा यंत्रणेचा नियमित आढावा घेण्यात येईल असे निर्देश अध्यक्षांनी दिले. तसेच आत्मा यंत्रणेने प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत केलेल्या कार्यवाहीचे टप्पे करुन गुणवत्तापूर्वक कामास गती देण्याच्या अनुषंगाने मा. सचिव व मृद व जलसंधारण | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व आत्मा संस्था पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मागणीस अनुसरून व वसुंधरा कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या निधीचा उपलब्धतेचा विचार करून वितरीत करण्यात आला. हा देखील निधी प्रेरक प्रवेश उपक्रमाचा निधी जसा उपलब्ध करण्यात आला होता त्याच पद्धतीने वितरीत करण्यात आला. याचप्रकारे उत्पादन पद्धती घटकांतर्गत रु. ४० कोटी आत्मा यंत्रणेच्या दि.१७/११/२०२३ च्या पत्रातील मागणीनुसार वितरीत करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले.<br>आत्मा यंत्रणेस वितरीत करण्यात आलेल्या प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत रु. २६.७१ कोटी व उत्पादन पद्धती घटकांतर्गत रु.२५ कोटी या निधीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा आढावा सचिव, मृद व जलसंधारण स्तरावर होणे आवश्यक असल्याचे मत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, उपजीविका यांनी समितीसमोर व्यक्त केले. | विभाग यांच्या स्तरावर नियमित आढावा घेण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा मासिक, आर्थिक व भौतिक अहवाल कृषि संचालक आत्मा यांनी वसुंधरा कार्यालयास सादर करावा अशा सुचना समितीने दिल्या. | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | ४)राज्यस्तरावरील प्रशिक्षणे वसुंधरा कार्यालयामार्फत पुणे येथे आयोजित करण्यास मान्यता देणेबाबत. | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) ही संस्था प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत आहे परंतु या संथेचे प्रशिक्षणातील कामकाज अत्यंत असमाधानकारक असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली. | उप-मुख्य कार्यकारी उपजीविका/क्षमता बांधणी, वसुंधरा कार्यालय यांनी पुणे येथे कार्यरत प्रशिक्षण संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या पायाभूत सुविधांचा वापर करून राज्यस्तरावरील प्रशिक्षणे आयोजित करावी व यासाठी प्रशिक्षणासाठीचा दर वाल्मी स्तरावरील प्रशिक्षणासाठी असलेला रु.२५००/- हा असे निर्देश समितीने दिले. हे प्रशिक्षणे आयोजित करण्यासाठी वसुंधरा स्तरावर एक प्रशिक्षण तज्ञ याची नियुक्ती करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |
| | ५) प्रवेश प्रेरक उपक्रम आणि उत्पादन पद्धती या घटकांची अमलबजावणी करण्यासाठी सेवापुरवठादार | प्रवेश प्रेरक उपक्रम आणि उत्पादन पद्धती या घटकांची अमलबजावणी करण्यासाठी सेवापुरवठादार संस्था नेमण्याबाबत संचालक, आत्मा यांना अदा केलेल्या Terms of Reference ला राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.२८.१२.२०२३ च्या नवव्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. संचालक आत्मा | प्रवेश प्रेरक उपक्रम आणि उत्पादन पद्धती या घटकांची अमलबजावणी करण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेच्या सेवा संपादनासाठी संचालक, आत्मा व आयुक्त कृषी यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे व आत्मा संस्था पुणे. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | संस्थेच्या सेवा संपादनासाठी संचालक, आत्मा व आयुक्त, कृषी यांना प्राधिकृत करणेबाबत. | यांचे प्रतिनिधी यांनी प्रस्तावित सेवापुरवठादार संस्थेच्या सेवा संपादनासाठी संचालक, आत्मा आणि आयुक्त कृषी यांना प्राधिकृत करावे. असे संचालक, आत्मा यांचे स्वाक्षरीचे विनंती पत्र समितीस सादर केले. | | | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(सुनील चव्हाण)
सदस्य सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

(सुनील चव्हाण)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा
तथा
सचिव, मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई